RESEARCH NEBULA
AN INDEXED, REFERRED & PEER REVIEWED JOURNAL

J-Gate INDEXED

ISSN 2277-8071

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

## TWO - DAY 46th ANNUAL CONFERENCE OF

## VIDHARBHA ARTHASHASTRA PARISHAD

4th & 5th February, 2023

*Organized by*

## LOKMANYA TILAK MAHAVIDYALAYA, WANI DIST. YAWATMAL

Guest Editor
**DR. PRASAD KHANZODE**
Principal
Lokmanya Tilak Mahavidyalaya,
Wani, Dist. Yavatmal

Executive Editor
**DR. KARMSING RAJPUT**
Head, Dept. of Economics
Lokmanya Tilak Mahavidyalaya,
Wani, Dist. Yavatmal

Chief Editor
**DR. G. P. KHANDARE**
Y.C. Arts and Science Mahavidyalaya,
Mangrulpir, Dist. Washim

Special Issue Published on 4th February, 2023
www.ycjournal.net

Scholarsteer Scholarly Information
DataCite
JIF

| | | | |
|---|---|---|---|
| 34. | अभिषेक संजय पद्मावार<br>रा.तू.म.नागपूर विद्यापीठ,नागपूर,<br>डॉ.करमसिंग रा.राजपूत<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि .यवतमाळ | कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम-एक दृष्टीक्षेप | 196 |
| 35. | प्रा.डॉ.दीपक शृंगारे<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख, आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे,<br>प्रा.विशाल मोकाशे<br>अर्थशास्त्र विभाग, आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे | कोविड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 200 |
| 36. | प्रा .दिपाली अतुल पडोळे<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय<br>अमरावती. | कोविड -19 साथीच्या रोगाचे भारतीय शेतीवरील परिणाम | 205 |
| 37. | प्रा. डॉ. नीता नंदलाल तिवारी<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>श्री धाबेकर कला महाविद्यालय,खडकी, अकोला | कोविड-19 महामारीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम | 208 |
| 38. | प्रा.डॉ.व्ही.जी.जायभाये<br>सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग,<br>विद्या सागर कला महाविद्यालय खैरी (बिजेवाडा), रामटेक. | कोवीड १९ चे भारतीय अर्थव्यस्थेवरिल परिणाम | 211 |
| 39. | प्राचार्य, डॉ. संजय धनवटे<br>नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज<br>कारंजा (घाडगे), जिल्हा - वर्धा<br>डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे<br>सहयोगी प्राध्यापक, नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज,<br>कारंजा (घाडगे), जिल्हा - वर्धा | कोविड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम | 214 |
| 40. | डॉ. ममता आर साहू<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>स्व.वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय,<br>रोहणा , ता. आर्वी जि.वर्धा | कोविड - १९ चे भारतीय अर्थव्यवस्थेवरिल परिणाम | 220 |
| 41. | डॉ. सुनिल शिंदे<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर (म.रा.) | कोविड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावरील परिणाम: एक दृष्टीक्षेप | 223 |
| 42. | प्रा. मिलींद ढाले<br>सहायक प्राध्यापक,<br>षि.प्र.म. विज्ञान व गिलाणी कला वाणिज्य महाविद्यालय<br>घाटंजी जि.यवतमाळ | कोविड 19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परीणाम | 227 |
| 43. | डॉ. गजानन सोमकुवर<br>सहयोगी प्राध्यापक<br>बॅरिस्टर शेषराव वानखेड कला व वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा<br>जिल्हा नागपूर | कोरोना 19 चा भारतीय कृषी उद्योग व पर्यटन क्षेत्रावर वरील परिणाम | 231 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

*Two - Day 46TH Annual Conference of* Vidharbha Arthashastra Parishad
@ Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani Dist. Yawatmal
4th & 5th February, 2023

**डॉ. सुनिल शिंदे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भिवापूर महाविद्यालय,
भिवापूर
जि. नागपूर (म.रा.)

# कोविड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावरील परिणाम: एक दृष्टीक्षेप

*प्रस्तुत संशोधन लेखामध्ये कोविड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावरील परिणाम एक दृष्टीक्षेप या विषयांतर्गत करण्यात येणा-या अभ्यासविषयामध्ये भारतात कोविड-19 च्या काळात लावलेल्या निर्बंधामुळे अर्थव्यवत्सेचे जे महत्वाचे क्षेत्र प्रभावित झाले ज्या क्षेत्राला अतोनात नुकसान सहन करावे लागले होते त्यातील प्रमुख क्षेत्राचा अंतर्भाव करण्यात आलेला असून यामध्ये प्रामुख्याने कृषी क्षेत्र, पर्यटन क्षेत्र, बांधकाम क्षेत्र, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग, बँकिंग क्षेत्र, हॉटेल इंडस्ट्रिज, शैक्षणिक क्षेत्र, वाहतुक क्षेत्र, सेवा क्षेत्र, शेअर मार्केट व रोजगारावरील परिणामांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. कोविड-19 प्रकोपामुळे वेगाने विकसित राष्ट्रांकडे आणि आर्थिक महासत्ताकडे वाटचाल करणा-या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अडथळा निर्माण केलेला असून अर्थव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. कोविड-19 च्या काळात देशव्यापी टाळेबंदीमुळे अनेक कुटूंबे उद्वस्त झाली आहेत. अनेक लोकांचा रोजगार गेलेला आहे तर अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन लेखातून अर्थव्यवस्थेच्या प्रमुख क्षेत्रावरील परिणामांचा विचार करण्यात आलेला असून उपसंहाराच्या माध्यमातून काही सूचना केलेल्या आहेत.*

➢ **प्रस्तावनाः**

कोविड-19 या विषाणूच्या महामारीचा भारतावरच नव्हे तर संपूर्ण जगावर वाईट परिणाम झालेला आहे. या विषाणूच्या महामारीतून लोकांचे जीव वाचविण्यासाठी अनेक देशांनी गर्दीतून होणारा संसर्ग रोखण्यासाठी व्यापक प्रमाणावर टाळेबंदी करून लोकांना एकत्रित येण्यापासून रोखले याचा परिणाम छोटे मोठे उद्योग, लहान मोठ्या प्रमाणावरील व्यवसाय, किरकोळ व ठोक व्यापार, शिक्षण, पर्यटन, आणि सेवा क्षेत्रावर झाला. टाळेबंदीमुळे संपूर्ण जगाचे आर्थिक चक्र मंदावले यापासून भारत सुध्दा वंचित राहु शकला नाही. भारतामध्ये विदेशातून येणा-या प्रवाशांच्या माध्यमातून फेब्रुवारी 2020 मध्येच कोरोनाच्या विषाणुने भारतात प्रवेश केला. मार्च महिन्यापासून भारतामध्ये हा संसर्ग वेगाने वाढायला लागला त्यामुळे केंद्र सरकारने 24 मार्च 2020 पासून देशामध्ये टाळेबंदीचे लागू केली या देशव्यापी टाळेबंदीचा फटका देशातील काही उद्योगांचा अपवाद वगळता सर्वच क्षेत्रावर कमी-अधिक प्रमाणात झालेला आहे. या टाळेबंदीमुळे अगोदरच नोटबंदी आणि जीएसटीच्या चक्रामध्ये अडकलेल्या अर्थव्यवस्थेचे आर्थिक संकट आणखी वाढत गेले. टाळेबंदीच्या काळातील निर्बंधामुळे अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग, व्यापार, वाहतुक, पर्यटन या क्षेत्राचे अतोनात नुकसान झाले. बेरोजगारीचा दर वाढला. लाखो लोकांचा रोजगार गेल्यामुळे त्याच्यापुढे उपजीविका चालविण्याचे संकट निर्माण झाले. या काळात टाळेबंदीमुळे लहान-मोठ्या व्यावसायीक, उद्योगपती, व्यापारी, विक्रेते आणि बेरोजगारांनी आत्महत्या केल्या. कोविड-19 मुळे गरीब आणि ज्याचे हातावर पोट आहे की ज्यांना दिवसभर काम केल्याशिवाय त्यांच्या घरातील चुल पेटत नाही अषा लोकांचे खुपच हाल झाले त्यांनी मरणादायी यातना भोगल्या आहेत. अर्थव्यवस्थेला गती देऊन अर्थव्यवस्थेचे चाक रूळावर आणण्यासाठी काही महिन्यानंतर अनलॉकला सुरवात झाली. परंतु या

काळातील कोरोनाच्या संकटामुळे झालेले नुकसान अजुनही पूर्णपणे भरून निघाले नाही. प्रस्तुत शोधनिबंधातून कोविड-19 चा भारताच्या विविध क्षेत्रावर झालेला परिणामाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

- **अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावरील परिणाम**

भारतामध्ये सद्यस्थितीत कोविड-19 चा प्रभाव कमी असल्यामुळे अर्थव्यवस्थेचे आर्थिक चक्र सुरळीत सुरू आहे. परंतु मागील 2020-21 या वर्षामध्ये कोविड-19 च्या प्रभावामुळे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर गंभिर व दुरगामी प्रतिकूल परिणाम घडून आला. आजही अर्थव्यवस्थेतील अनेक क्षेत्र त्यामधून सावरू शकले नाही. आजही अनेक देशांमध्ये कोविड-19 चा संसर्ग सुरू आहे. अनेक देश आजही महामारीशी झुंज देत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालानुसार म्हटल्याप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेला कोविड-19 च्या नुकसानीपासून सावरण्यासाठी 12 वर्षापेक्षा जास्त कालावधी लागण्याची क्षक्यता आहे. कोरोना विषानाूमुळे निर्माना झालेले आर्थिक संकट हे जागतिक असून या संकटामुळे जगातिल विकसित आणि श्रीमंत देशाच्या अर्थव्यवस्थेसोबतच आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करणा-या भारतीय अर्थव्यस्थेला फार मोठा फटका बसला आहे.

**1) कृषी क्षेत्र:** कोविड-19 च्या प्रकोपामुळे भारतामध्ये करण्यात आलेल्या टाळेबंदी मधून कृषी क्षेत्र अलिप्त होते. कोविड.19 चा कृषीच्या उत्पादन व उत्पादकतेवर फारसा परिणाम जाणवला नाही परंतु इतर क्षेत्रामध्ये टाळेबदी असल्यामुळे त्याचा फटका कृषी आणि शेतक-यांना निश्चितच बसला यामध्ये प्रामुख्याने शेतातील माल काढणे आणि तो बाजारपेठेमध्ये विक्रीला आणने यामध्ये आलेल्या अनेक अडचणीमुळे शेतकरी हवालदील झालेला होता. शेतमाल काढण्यासाठी आवश्यक कामगारांची कमतरता, माल विक्रीला आणण्यासाठी वाहतूक सुविधेतील अडथळे, शेतात काम करणा-या शेतमजूरांच्या वाहतुक व्यवस्थेमुळे निर्माण झालेली समस्या, बाजारपेठेत माल पोहचविण्यामध्ये आलेली समस्या, शेतीला लागणारी आदाने आणण्यामध्ये आलेली समस्या, शेतमाल व भाजीपाल्याच्या पडलेल्या किंमती या व इतर अनेक कारणांमुळे शेतकरी कोविड-19 च्या काळात त्रस्त झाला होता.

**2) पर्यटन क्षेत्र:** भारतामध्ये कोरोना संकटामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत लॉकडाऊन केल्यामुळे सर्वात जास्त फटका हा पर्यटन क्षेत्राला बसला आहे. कारोना हा संसर्गजन्य आजार असल्यामुळे भारताने देशाच्या सिमा बंद केल्या, विमान वाहतुक बंद केली, देशातील पर्यटन स्थळावर जाण्यास बंदी आणली त्यामुळे या काळात भारतामध्ये करोडो रूपयांचे बुकिंग रद्द झाले परिणामतः पर्यटन व्यवसायावर अवलंबून असलेल्या ट्रॅवल आणि टुरिझम, हॉटेल व्यवसाय, रिसोर्ट, कृषी पर्यटन, टॅक्सी व्यवसाय, पर्यटन स्थळी सेवा देणारे छोटे-मोठे विक्रेते इत्यादीवर मोठा परिणाम झाला आहे. या क्षेत्राशी संबंधित अनेक व्यवसाय बंद पडलेले आहेत. अनेक व्यवसायांचे उत्पन्न कमी झाले आहे. अनेक व्यावसायीक कर्जामध्ये बुडलेले आहेत कर्जाचे हप्ते भरण्यासाठीचे पैसे त्यांच्याकडे नाहीत या कारणामुळे अनेक छोटे- मोठे व्यावसायीक, विक्रेते यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या व्यवसायावर रोजीरोटीसाठी अवलंबून असणा-या लोकांमध्ये भितीचे सावट निर्माण झाले आहे. एका अंदाजानुसार या व्यवसायाचे सुमारे 50 कोटी डॉलर्सहुन अधिकचे नुकसान झाले आहे. विदेशी पर्यटकांच्या माध्यमातून मिळणारे हजारो कोटी डॉलर्सच्या परकीय चलनापासून देशाला मुकावे लागले आहे.

**3) बांधकाम क्षेत्रः** कोरोना काळात करण्यात आलेल्या टाळेबंदीचा सर्वात वाईट परिणाम बांधकाम क्षेत्रावर झालेला दिसून येतो. भारतामध्ये बांधकात क्षेत्र हे खुप मोठे क्षेत्र आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये आणि देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये या क्षेत्राचे खुप मोठे योगदान असते. तसेच या क्षेत्रामध्ये काम करणा-या लोकांची संख्या करोडोच्या घरात आहे. परंतु कोविड-19 च्या काळात जवळपास वर्षभर बांधकाम बंद असल्यामुळे या व्यवसायामध्ये काम करणा-या व्यावसायीकांचे आणि काम करणा-या वर्गाचे, कामगारांचे अतोनात नुकसान झाले. नजीकच्या

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

भविष्यकाळात हे नुकसान भरून निघणारे नसेल. या काळात अनेक बांधकाम व्यावसायीक दिवाळखोरीमध्ये गेले तर बांधकाम व घरांच्या किंमतीमध्ये प्रचंड वाढ झाल्यामुळे घरांची मागणी घटली होती. या क्षेत्रात रोजगारनिर्मितीमध्ये घट होऊन बेकारी वाढली होती.

**4) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग:** भारतामध्ये या उद्योगांमध्ये काम करणा-या कामगारांची संख्या कोटीवर आहे. तसेच या उद्योगांची संख्या सुध्दा खुप जास्त आहे. कोविड-19 च्या काळात टाळेबंदीमुळे हे उद्योग अनेक महिने बंद होते याचा फटका या उद्योगातील व्यावसायीकांना आणि या उद्योगामध्ये काम करणा-या कामगारांना बसला. कोविड-19 च्या काळात अनेक उद्योग बंद पडले. लाखो कामगार बेकार झाले. अनेक व्यावसायीकांनी तर कोविडच्या काळात झालेल्या नुकसानीमुळे आत्महत्या सुध्दा केलेल्या आहेत. कोविड नंतरच्या काळात आज परिस्थिती थोडी सुधारली असली तरी अनेक बंद झालेले उद्योग पुन्हा सुरू होऊ शकले नाही. आणि अनेक कामगारांचा गेलेला रोजगार त्यांना परत मिळू शकला नाही हे वास्तव आहे.

**5) बॅंकिंग क्षेत्र:** कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात बॅंकांचे महत्वाचे योगदान असते. कोविड-19 च्या काळात अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रामध्ये झालेल्या प्रतिकूल परिणामांचा फटका या क्षेत्राला कर्जाचा पुरवठा करणा-या बॅंकावर सुध्दा झालेला होता. टाळेबंदीच्या काळात बॅंका बंद नव्हत्या परंतु बॅंकेचे आर्थिक व्यवहार मात्र घटलेले होते. या काळात बॅंकेच्या कर्जाची थकबाकी वाढलेली होती. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांकडून बॅंकेला येणारी वसूली थांबलेली होती. या काळात सरकारने कर्जाचा वसूलीवर काही महिने स्थगीती आणल्यामुळे बॅंकाच्या अनुत्पादीत कर्जाचा रकमेत वाढ झाली होती. थोडक्यात या काळात बॅंकांचे थकीत कर्ज वाढले होते. कर्ज वसूलीमध्ये घट झाली होती. अनुत्पादक कर्जात वाढ झाली होतो. नफ्यामध्ये घसरण झाली होती.

**6) हॉटेल इंडस्ट्रिज :** भारतामध्ये शहरी व ग्रामीण भागात पर्यटन स्थळी व नजीकच्या परिसरात खुप मोठी हॉटेल इंडस्टीªज उभी राहिली आहे. या इंडस्ट्रिजचे अतोनात नुकसान टाळेबंदिच्या काळामध्ये झालेले आहे. कोरोना संकटामुळे महसुलात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. पर्यटन व्यवसायात हॉटेल बुकिंग अनेक महिने आधी केली जाते. सी. आय. आय. च्या अहवालानुसार यावर्षीची 80 टक्के हॉटेल बुकिंग रद्द करण्यात आलेली होती. आणि अजुनही नजिकच्या काळात हॉटेल बुकिंग सुरू होण्याची शक्यता कमीच दिसून येते एका अंदाजानुसार या क्षेत्राचे 1.58 लाख कोटी रू.चे नुकसान होईल. तर या व्यवसायावर अवलंबून असलेल्या ब्रॅडेंड हॉटेल्सचे सुमारे 1.10 लाख कोटी रू. चे नुकसान होईल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

**7) शैक्षणिक क्षेत्र:** कोविड-19 चा परिणाम शैक्षणिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात झालेला आपल्यालाल दिसून येईल. भारतामध्ये कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी केलेल्या उपायांमुळे शैक्षणिक संस्था जवळपास एक ते दिड वर्ष बंद होत्या. भारतात 15 लाख शळा बंद होत्या याचा फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर व शिक्षक व कर्मचा-यावर झाला. या काळात सरकारी अनुदानावर असलेल्या शैक्षणिक संस्थामध्ये काम करणा-या वर्गाचे पगार नियमित सुरू होते. परंतु शैक्षणिक संस्थामध्ये काम करणारा सर्वात मोठा वर्ग खाजगी संस्थामध्ये काम करतो. अशा वर्गाला नियमित पगार मिळाला नाही. अनेक संस्थांनी कर्मचा-यांना पगार दिला नाही. तर अनेक संस्थांनी कमी उत्पन्नाचे कारण समोर करून कर्मचा-यांना कामावरून कमी केले.

**8) सेवा क्षेत्र:** कोविड-19 च्या काळात केंद्र व राज्य सरकारने मुक्त संचारावर लावलेल्या निर्बंधामुळे सेवा क्षेत्रावर प्रतिकूल दुरगामी स्वरूपाचा परिणाम झाला. भारतामध्ये सेवा क्षेत्रामध्ये काम करणारा वर्ग खुप मोठा आहे. टाळेबंदीचा कालावधी वाढल्याने सेवा क्षेत्रात काम करणा-या अनेक नौकरदारांच्या नौक-या गेल्या या क्षेत्रातील रोजगार निर्मिती घटली, उत्पादन क्षमतेवरही प्रतिकूल स्वरूपाचा परिणाम झाला. नफ्याचे प्रमाण घटले.

**9) वाहतुक क्षेत्र:** कोरोनाचा संसर्ग कमी करण्यासाठी सरकारने सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

प्रवासी वाहतुकीवर निर्बंध आणले होते. भारतातील काम करणा-या वर्गापैकी एक मोठा वर्ग उपजिविकेसाठी या क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. या क्षेत्रावर टाळेबंदीचा दुरगामी स्वरूपाचा परिणाम घडून आला. कोविड-19 च्या टाळेबंदीमध्ये वाहतुक व्यवस्थेमध्ये मध्ये कार्यरत डाªयवर, कंडक्टर व या व्यवसायाशी संबंधित काम करणा-या अनेकांचा रोजगार गेला. हफ्तेवारीवर बँकेकडून कर्ज घेऊन आपली वाहने माल वाहतुक व प्रवासी वाहतुकी करीता वापरणा-या हजारो लोकांना बँकेचे कर्जाचे हफ्ते फेडणे कठीण झाले. अनेकांनी नुकसान टाळण्यासाठी स्वतःची वाहने विकून टाकली काही लोकांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली.

**10) शेअर मार्केट:** 2009 मध्ये शेअर बाजारात जे भितीचे वातावरन होते त्यापेक्षाही मोठे संकट कोविड-19 मुळे झाले. कोरोनामुळे लावलेल्या प्रतिबंधाचा मोठा तडाखा शेअर मार्केटला बसलेला आहे. कोविड-19 मध्ये केलेल्या टाळेबंदीमुळे शेअर मार्केटच्या खाली आलेले आहे. शेअर बाजारातील किंमती 30 ते 35 टक्के घसरल्याचे दिसून आले. अजुनही हे क्षेत्र पुरेसे सावरलेले नाही.

**11) रोजगारावरील परिणाम:** कोविड-19 मुळे लावण्यात आलेल्या प्रतिबंधामुळे निवडक क्षेत्र वगळता इतर क्षेत्रातील अर्थव्यवस्थेचे आर्थिक चक्र मंदावलेले होते. उत्पादन, व्यापार,व्यवसाय, वस्तू व सेवांची विक्री यामध्ये घट आली होती याचा परीणाम या क्षेत्रातील रोजगार निर्मितीच्या क्षमतेवरही झालेला होता. या काळात बेकारीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली होती. केंद्र सरकारने केलेल्या संकलित माहितीनुसार या काळात ग्रामीण भागात 23 टक्के तर शहरी भागात 31 टक्के बेकारी वाढलेली होती.

## ➢ उपसंहार

कोविड-19 चा भारतावरच नव्हे तर जगातील प्रमुख व विकसित अर्थव्यवस्था असलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थेवर आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर अत्यांत प्रतिकूल स्वरूपाचा परिणाम झालेला होता. प्रत्येंक देशाने खबरदारीचा उपाय म्हणून लावलेल्या टाळेबंदीमुळे अर्थव्यवस्थेचे अतोना त नुकसान झाले जे नजिकच्या काळात भरून निघणारे नाही. परंतु या संकटातून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक देश कसोसीने प्रयत्न करीत आहे. भारतामध्ये सुध्दा कोविड-19 च्या निर्बधामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्राला केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून पॅकेज देणे, बुस्टर देणे सुरू आहे. यामध्ये गती येण्याची गरज असून सरकारने कोविड-19 मुळे रोजगार गेलेल्यांचा रोजगार पुन्हा मिळऊन देण्यासाठी आणि रोजगार निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सार्वजनिक खर्चाची तरतुद करणे आवश्यक आहे. शेती व उद्योगांच्या विकासासाठी सरकारने विशेष धोरण आखले पाहिजे. पायाभूत सुविधांचा विकासावर भर दिला पाहिजे, देशांतर्गत उद्योगांची उत्पादन क्षमता वाढऊन निर्यात वाढीवर भर दिला पाहिजे. गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी योग्य ते पोषक वातातवरण तयार करणे गरजेचे आहे. त्यासाठी आर्थिक व तांत्रिक पाठबळ देणे गरजेचे आहे. या काळात वाढलेली आर्थिक विषमता कमी करण्यासाठी गरीबांच्या उत्पन्न वाढीवर भर दिला पाहिजे. आरोग्याशी संबंधित प्रत्येक क्षेत्राचे बळकटीकरण करणे आवष्यक असून देशाला भविष्यातील कोणत्याही आरोग्यविशयक आपत्तीसाठी तयार केले पाहिजे. देशाच्या ग्रामीण, दुर्गम व आदिवासी भागात आरोग्य सेवा विस्तारण्यावर भर देऊन शिक्षण क्षेत्राला बळकटी आणली पाहिजे.

## संदर्भसूची

1) दैनिक वर्तमानपत्र: लोकमत, सकाळ, नवराष्ट्र, दैनिक लोकसत्ता
2) न्युज चॅनलच्या माध्यमातून प्राप्त माहिती.
3) कोविड-19 आणि भारतीय अर्थव्यवस्था: संपादक, डॉ. अशोक पी. टिपरसे, सिध्दी पब्लिकेशन, नांदेड
4) कोरोनाचे नाव कामगारावर घाव : अजित अभ्यंकर यांचा लेख 20 मे 2020
5) योजना मासिक: एप्रिल 2020
6) www.google.com